**अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना.**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्र. अविवि-२०१२/प्र.क्र.३६/१२/का. ६,**
**दिनांक :- १५.०९.२०१२.**

संदर्भ :- १) अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि-२००९/ प्र.क्र.५२/०९/ का-१, दि.५.२.२००९.
२) अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि-२००९/ प्र.क्र.१५/०९/ का. ६, दि. १७.११.२००९
३) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि- २०१०/ प्र.क्र.१००/१०/का-६, दि. २०.०७.२०१०
४) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि-२०११/ प्र.क्र.३३/११/का-६, दि. ०४.०७.२०११

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे बाहुल्य असलेल्या राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनुदान योजना सन २००८-०९ पासून राबविण्यात येत आहे. गत तीन वर्षामध्ये या योजनेला राज्यभरातील अल्पसंख्याक शाळांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद तसेच या योजनेची सकारात्मक फलनिष्पत्ती आणि सदर योजना यापुढेही चालू ठेवण्याची आवश्यकता विचारात घेऊन ही योजना सन २०१२-२०१३ या वर्षापासून पुढे देखील राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

मागील तीन वर्षांपासून ही योजना राबविताना उद्‌भवलेल्या प्रशासकीय अडचणी, लाभार्थ्यांच्या समस्या व अंमलबजावणीतील उणिवा यांचे निराकरण करुन सदर योजना सन २०१२-२०१३ पासून पुढीलप्रमाणे राबविण्यास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे बाहुल्य असलेल्या राज्यातील शासनमान्य खाजगी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी, ज्या शासन मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित

अल्पसंख्यांक बहुल शासनमान्य खाजगी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये किमान **७०%** अल्पसंख्याक विद्यार्थी (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारसी, जैन) शिक्षण घेत आहेत, तसेच शासनमान्य खाजगी अपंगाच्या शाळांमध्ये किमान **५० %** अल्पसंख्याक विद्यार्थी (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारसी, जैन) शिक्षण घेत आहेत अशा शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी कमाल रु.२ लाख एवढया रकमेच्या मर्यादेपर्यंत अनुदान शासन उपलब्ध करुन देईल. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा व जिल्हा परिषदा इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिपत्याखाली चालविण्यात येत असलेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालये व अपंग शाळा या योजनेसाठी पात्र असणार नाहीत.

**या पायाभूत सोयी-सुविधांमध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेल :-**

१) शाळेच्या इमारतींचे नुतनीकरण व डागडूजी,
२) शुद्ध पेयजलाची व्यवस्था करणे,
३) ग्रंथालय अद्ययावत करणे,
४) प्रयोगशाळा उभारणे / अद्ययावत करणे,
५) संगणक कक्ष उभारणे /अद्ययावत करणे,
६) प्रसाधनगृह / स्वच्छतागृह उभारणे / डागडूजी करणे.
७) शाळा खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचेसची व्यवस्था करणे.
८) वर्ग खोल्यांमध्ये आवश्यकतेनुसार पंख्यांची व्यवस्था करणे.
९) इन्व्हर्टरची सुविधा निर्माण करणे. ( मुंबई शहर व उपनगरे वगळून )
१०) इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य.

**<u>योजनेची कार्यपध्दती :-</u>**

**१)** या योजनेच्या विस्तृत प्रसिध्दीसाठी शासनातर्फे राज्यातील प्रमुख वृत्तपत्रात जाहिरात देण्यात येईल. या जाहिरातीनुसार सदर योजनेंतर्गत अनुदान मिळविण्यास इच्छूक असलेल्या लाभार्थ्यांनी प्रस्तुत शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता करुन सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या विहित नमून्यातच संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे **परिपूर्ण प्रस्ताव सप्टेंबर अखेर पर्यंत सादर करणे आवश्यक असेल, मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.**

**२)** उपरोक्तप्रमाणे विहित मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांची संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय निवड समिती विहीत निकषांनुसार छाननी करील. छाननीमध्ये अपात्र ठरवलेल्या प्रस्तावांशी संबंधित लाभार्थ्यांना अपात्रतेची कारणे त्यांच्या निर्दशनास आणून त्यांना अपात्रतेच्या कारणांचे निराकरण व त्रुटींची पुर्तता करण्यासाठी योग्य अवधी **(जास्तीत जास्त एक महिना)** देण्यात येईल. अंतिम छाननीअंती निवड समितीने पात्र ठरवून निवड केलेल्या लाभार्थ्यांची यादी संपूर्ण तपशीलासह संबंधित जिल्हाधिकारी आपल्या शिफारशींसह व निधीच्या मागणीसह छाननी सूचीनुसार (scrutiny sheet) (परिशिष्ट- ब) मध्ये **दरवर्षी नोव्हेंबर अखेरपूर्वी अल्पसंख्याक विकास विभागाला सादर करतील. त्यानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत.**

**३)** शासनातर्फे अंतिमत: पात्र ठरविण्यात आलेल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व अपंग शाळांना अनुदान वाटप करण्याची अंतिम मंजूरी शासन स्तरावर प्रदान करण्यात येऊन

अनुदान वितरणाचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तद्नंतर लाभार्थ्यांना प्रत्यक्ष अनुदानाचे वितरण करण्याची अंतिम जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची राहील. अनुदान मिळण्यास पात्र ठरलेल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व अपंग शाळांना मंजूर अनुदानाची पूर्ण रक्कम संबंधित शाळेच्या / कनिष्ठ महाविद्यालयाच्या/ अपंग शाळेच्या नावाने (कमाल रु.२ लाखाच्या मर्यादेपर्यंत) धनादेशाद्वारे देण्यात येईल.

४) या योजनेतंर्गत ज्या शाळांनी या योजनेचा यापूर्वी फायदा घेतलेला नाही त्यांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच अनुदानास पात्र ठरलेल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व अपंग शाळांना निधीच्या उपलब्धतेनुसार व मर्यादेत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

**<u>योजनेंतर्गत प्राप्त अर्जांची छाननी करण्याकरिता उच्चस्तरीय निवड समिती</u> :-**

संबंधित शाळांकडून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त झाल्यानंतर या अर्जांची उच्चस्तरीय निवड समितीमार्फत विहित निकषांनुसार छाननी केली जाईल.

संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखालील या उच्चस्तरीय निवड समितीमध्ये :-

अ) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद;
ब) आयुक्त, महानगरपालिका/ मुख्याधिकारी, नगरपालिका;
क) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग;
ड) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,
ई) शिक्षण अधिकारी (प्राथमिक); व
फ) शिक्षण अधिकारी (माध्यमिक); यांचा सदस्य म्हणून समावेश असेल.

**जिल्हा नियोजन अधिकारी हे सदर समितीचे सदस्य सचिव असतील.**

**<u>योजनेच्या अटी व शर्ती :-</u>**

१) सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी यापूर्वी ज्या प्रयोजनार्थ अनुदान प्राप्त केले आहे, ते त्याच प्रयोजनार्थ उपयोगात आणले असल्याचे प्रमाणित करुन त्याबाबतचे विहित नमुन्यातील **(प्रपत्र - ५)** गट शिक्षणाधिकारी//शिक्षण निरिक्षक/ उप शिक्षणाधिकारी यांच्या प्रतिस्वाक्षरीचे उपयोगिता प्रमाणपत्र किंवा प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रस्तावासोबत सादर करणे लाभार्थ्यांना बंधनकारक राहील.

२) यापूर्वी ज्या पायाभूत सोयी-सुविधांच्या प्रयोजनासाठी अनुदान प्राप्त झाले आहे, त्याच पायाभूत सोयी सुविधांच्या प्रयोजनासाठी लाभार्थ्यांनी सादर केलेले प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत. तथापि, शाळेच्या इमारतीचे आकारमान/क्षेत्रफळ आणि अथवा विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता गतवर्षी निर्माण केलेल्या सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे योग्य समर्थन प्रस्तावात नमूद केल्यास, अशा अपवादात्मक परिस्थितीत पुन्हा त्याच सुविधांसाठी मागणी केलेले प्रस्ताव निवड समितीसमोर विचारार्थ ठेवण्यात येतील. निवड समिती प्रस्तावातील समर्थन विचारात घेऊन योग्य निर्णय घेईल.

३) अर्जांसोबत संबंधित शैक्षणिक संस्थेने खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

अ) शाळेने या शासन निर्णयाच्या प्रपत्र "१" प्रमाणे सादर करावयाचे स्वयंसाक्षांकित प्रतिज्ञापत्र,

ब) शाळा सुरु करण्यासाठी शासनाकडून मिळालेल्या मान्यतेच्या पत्राची सत्यप्रत,

क) संस्थेच्या सदस्यांची यादी, **(प्रपत्र - २)**

ड) निकषानुसार समूहनिहाय धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी असल्याबद्दल पटसंख्येचा संबंधित गट शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरिक्षक/ उप शिक्षणाधिकारी यांच्याकडील दाखला. **(प्रपत्र - ३)**

ई) इमारतीचा आणि अथवा वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव असल्यास मालमत्तेसंदर्भातील संस्थेच्या मालकीच्या पी.आर.कार्ड, गांव नमूना क्र.७/१२, भाडेपट्टा करार पत्राचा उतारा इ. च्या सत्यप्रती.

फ) दुरुस्ती संदर्भातील आर्किटेक्ट/ लायसेंस्ड इंजिनीयर यांनी प्रचलित डी.एस. आर.नुसार तयार केलेले तपशीलवार अंदाजपत्रक,

च) संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत,

छ) संस्थापन समयलेखे/ पोटनियम/ ट्रस्ट डीडची सत्यप्रत,

१) संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या विद्यमान विश्वस्त /सदस्य यांची नांवे दर्शविणाऱ्या धर्मादाय आयुक्तांमार्फत प्रदान करण्यात आलेल्या अनुसूची-I ची प्रत.

२) संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या विश्वस्त / सदस्यांच्या नांवात बदल झाला असल्यास धर्मादाय आयुक्तांनी संस्थेस प्रदान केलेल्या फेरफार अहवालाची प्रत.

ज) लगतच्या मागील चार वर्षापैकी किमान तीन वर्षांचे संस्थेचे वार्षिक अहवाल/ लेखापरिक्षण झालेले लेखे, (ताळेबंद पत्रकासह).

झ) खरेदी करावयाच्या वस्तू संदर्भात मागविलेल्या दरपत्रकांच्या प्रती

४. अनुदान प्राप्त झाल्याची आगाऊ पावती . **(प्रपत्र - ४)**

५. संस्थांनी परिपूर्णरित्या भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांकडे **सप्टेंबर अखेर पर्यंत** सादर करणे आवश्यक राहील. **विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव कोणत्याही स्तरावर स्विकारले जाणार नाहीत.**

६. अनुदान मंजूर केल्यानंतर संबंधित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व अपंग शाळांनी त्यांच्या प्रस्तावात उल्लेख केलेल्या कामासाठी अनुदानाचा योग्यरित्या वापर करुन त्याबाबतचे गट शिक्षणाधिकारी//शिक्षण निरिक्षक/ उप शिक्षणाधिकारी यांच्या प्रतिस्वाक्षरीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) (प्रपत्र - ५), देयके, फोटो इत्यादीसह संबंधित जिल्हाधिका-यांकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

**७. या योजनेसंदर्भातील तक्रारीबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय निवड समितीमार्फत त्यांचे निवारण केले जाईल व समितीचा निर्णय अंतिम राहील.**

या योजनेसाठी होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडई-१, मुख्य लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण २००, इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (२१) अल्पसंख्याक शाळांना पायाभूत सुविधा पुरविण्याकरिता सहायक अनुदान (२२३५- ए- ३४७) ३१ सहायक अनुदान" या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात येईल व त्या त्या आर्थिक वर्षात या शीर्षाखाली उपलब्ध तरतुदीतून भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर **www.mdd.maharashtra.gov.in** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२०९१७१४४७१११६०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( उज्ज्वला सं. दांडेकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी,
आयुक्त, महानगरपालिका,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक )
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग,
संचालक (प्रशिक्षण),व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी),
निवडनस्ती,
* पत्राने.

# जोडलेल्या कागदपत्रांची सूची

१) पूर्ण भरलेला अर्ज नमूना.

२) शाळेने **प्रपत्र-१** प्रमाणे सादर करावयाचे स्वयंसाक्षांकित प्रतिज्ञापत्र

३) संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

४) संस्थापन समयलेखे/ पोटनियम/ ट्रस्ट डीडची सत्यप्रत.

५) संस्थेच्या सदस्यांची सत्यापित यादी . **(प्रपत्र-२)**

६) संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या विद्यमान विश्वस्त /सदस्य यांची नांवे दर्शविणाऱ्या धर्मादाय आयुक्तांमार्फत प्रदान करण्यात आलेल्या **अनुसूची-I** ची प्रत.

७) संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या विश्वस्त / सदस्यांच्या नांवात बदल झाला असल्यास धर्मादाय आयुक्तांनी संस्थेस प्रदान केलेल्या **फेरफार अहवालाची प्रत (अनुसूची-III).**

८) मागील **चार पैकी तीन** वर्षांचे वार्षिक अहवाल/ लेखापरिक्षण झालेले लेखे (ताळेबंद पत्रकासह).

**९) शाळा सुरु करण्यासाठी शासनाकडून मिळालेल्या मान्यतेच्या पत्राची प्रत.**

१०) संस्थेच्या मालकीच्या मालमत्तेसंदर्भातील पी.आर.कार्ड/गांव नमूना क्र.७/१२ चा उतारा इ.च्या सत्यप्रती.

११) दुरुस्ती संदर्भातील आर्किटेक्ट/ लायसेंस्ड इंजिनीयर यांनी प्रचलित डी.एस.आर.नुसार तयार केलेले तपशीलवार **अंदाजपत्रक .**

१२) खरेदी करावयाच्या वस्तूं संदर्भात मागविलेल्या **दरपत्रकांच्या** प्रती.

१३) शासनमान्य पटसंख्येचा गट शिक्षणाधिकारी/शिक्षण निरिक्षक/ उप शिक्षणाधिकारी यांच्याकडील दाखला. **(प्रपत्र-३)**

१४) शाळेच्या इमारतीचे/ दुरुस्ती करावयाच्या भागाचे पोस्ट कार्ड आकाराचे **रंगीत छायाचित्र.**

१५) शाळेला मंजूर होणाऱ्या अनुदानासंबंधीची आगाऊ पावती. **(प्रपत्र-४)**

१६) या योजनेंतर्गत मागील वर्षी अनुदान मंजूर करण्यात आले असल्यास ते ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे ते त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात आले असल्याबाबतचे गट शिक्षण अधिकारी/शिक्षण निरीक्षक/उप शिक्षणाधिकारी यांच्या प्रतिस्वाक्षरीचे विहीत नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र **(प्रपत्र - ५)** किंवा त्याची **सत्यप्रत.**

| संस्थेच्या अध्यक्षांचे गट शिक्षण अधिकारी/ शिक्षण निरिक्षक/ उप शिक्षणाधिकारी यांनी सांक्षाकित केलेले छायाचित्र | संस्थेच्या **सचिवांचे** गट शिक्षण अधिकारी/ शिक्षण निरिक्षक/ उप शिक्षणाधिकारी यांनी सांक्षाकित केलेले छायाचित्र |
|---|---|

# परिशिष्ट - अ

## महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभाग
## अल्पसंख्याक खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना अर्जाचा नमूना

१) अ) शाळेचे पूर्ण नांव : ____________________

ब) पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता (दूरध्वनीसह) : ____________________

२) शाळा चालविणा-या संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता (दूरध्वनीसह) :

३) अ) संस्थेच्या अध्यक्षांचे पूर्ण नांव व पत्ता (दूरध्वनीसह) :

ब) संस्थेच्या सचिवांचे पूर्ण नांव व पत्ता (दूरध्वनीसह) :

(संस्थेच्या सदस्यांचा तपशील प्रपत्र-२ मध्ये द्यावा)

४) संस्थेचा उद्देश्य आणि उपक्रम :
(सोबत संस्थापन समयलेखे/ ट्रस्टडीड/पोटनियम इ. जोडावे)

५) संस्थेच्या नोंदणीचा क्रमांक :

अ) सहकारी संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत :

ब) सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम, १९५० अंतर्गत :

क) वक्फ अधिनियम, १९९५ अंतर्गत :

इ) इतर कोणत्याही कायद्यांतर्गत :

फ) शिक्षण विभागाच्या मान्यतेची तारीख व तपशील :

६) शाळेमध्ये मंजूर आणि चालू इयत्ता/ तुकडया ? :

| इयत्तेचे स्वरुप | इयत्ता | तुकडया |
|---|---|---|
| मंजूर | | |
| चालू | | |

७) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळांमध्ये मान्य पटसंख्या किती आहे ? :
( इयत्तानिहाय/ विद्यार्थी- विद्यार्थिनी निहाय स्वतंत्रपणे तक्ता प्रपत्र-३ मध्ये द्यावा.)

८) अ) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळा कोणता अभ्यासक्रम शिकविते ? :
(एस.एस.सी./सी.बी.एस्.ई./आ.य.सी.एस्.ई./इतर)

ब) माध्यम : मराठी/उर्दू/ इंग्रजी/हिंदी/इतर

९) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळांमधील शिक्षक/शिक्षिकांची संख्या :
(नियुक्तीचा दिनांक, शैक्षणिक पात्रता, प्रशिक्षित/ अप्रशिक्षित इ. माहिती स्वतंत्रपणे जोडावी)

१०) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळांकडील सोयी सुविधा :

अ) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय /अपंग शाळा संस्थेच्या मालकीच्या इमारतीमध्ये चालविली जाते की भाडयाच्या इमारतीमध्ये ? तपशील द्यावा. :

ब) i) बांधकामाचा तपशील :

| विषय | बांधकाम एकूण | प्रयोजन | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शैक्षणिक कार्य | प्रशासकीय कार्य | प्रयोग शाळा | संगणक प्रयोगशाळा | ग्रंथालय | स्टाफ रुम | इतर स्वच्छता गृह |
| खोल्यांची संख्या | | | | | | | | |
| क्षेत्रफळ | | | | | | | | |

ii) आवश्यक बांधकाम

| मान्य पट संख्या | वर्ग खोल्यांसाठी आवश्यक क्षेत्रफळ | मान्य शिक्षक संख्या | स्टाफरुम साठी लागणारे क्षेत्रफळ | कार्यालयीन कर्मचारी संख्या | कार्यालया साठी आवश्यक क्षेत्रफळ | प्रयोगशाळे साठी आवश्यक क्षेत्रफळ | ग्रंथालया साठी आवश्यक क्षेत्रफळ | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

iii) लागणारे अतिरिक्त बांधकाम

| वर्ग खोल्यासांठी आवश्यक क्षेत्रफळ | स्टाफरुम साठी लागणारे क्षेत्रफळ | कार्यालयासाठी आवश्यक क्षेत्रफळ | प्रयोगशाळेसाठी आवश्यक क्षेत्रफळ | ग्रंथालयासाठी आवश्यक क्षेत्रफळ | इतर |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) शाळा /कनिष्ठ महाविद्यालय व अपंग शाळेमध्ये उपलब्ध स्वच्छतागृहांची माहिती :

| स्वच्छतागृह | संख्या | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| महिला | | |
| पुरुष | | |

१२) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळामधील
पिण्याच्या पाण्याच्या सुविधांचा तपशील :

१३) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळेचे
स्वत :चे खेळाचे मैदान आहे काय ? :
असल्यास आकारमान किती ?

१४) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळेच्या
मालकीची स्थावर जंगम मालमत्ता आहे काय ?
असल्यास तपशील द्यावा. :

१५) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व अपंग शाळेमध्ये
इतर उपक्रम राबविले जातात काय ? तपशील

१५) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळेचे
उत्पन्नाचे स्त्रोत कोणते आहेत ? :

वार्षिक उत्पन्न किती (मागील तीन वर्षांची आकडेवारी द्यावी)

| **वर्ष** | **उत्पन्न** |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

१७) मागणीच्या रकमेचा तपशील

| अ. क्र. | निर्माण करावयाच्या सुविधा | संख्या | दुरुस्तीची/बांध-कामांची/ खरेदीची किंमत प्रति नग | आवश्यक रक्कम रुपये | किती विद्यार्थ्यांना लाभ मिळणार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **शाळा / कनिष्ठ महाविद्यालये / अपंग शाळेच्या इमारतीची दुरुस्ती/ नूतनीकरण** | | | | | |
| | अ) शाळा खोल्यांची डागडुजी/दुरुस्ती | | | | | |
| | ब) छत दुरुस्ती | | | | | |
| | क) शाळा खोल्या मध्ये फरशी बसविणे | | | | | |
| २ | **पिण्याच्या पाण्याची सुविधा** (कूलर/फिल्टर सह) | | | | | |
| ३ | **ग्रंथालयासाठी** | | | | | |
| | अ) शैक्षणिक साहित्य/ किट्स खरेदी | | | | | |
| | ब) बुक बँक/ क्रमिक पुस्तके खरेदी | | | | | |
| | क) इतर पुस्तके खरेदी | | | | | |
| ४ | **प्रयोग शाळा उभारणे/अद्ययावत करणे (सविस्तर तपशिल द्यावा)** | | | | | |
| ५ | **संगणक कक्ष** | | | | | |
| | अ) संगणक संख्या | | | | | |
| | ब) प्रिंटर्स | | | | | |
| | क) सॉफ्टवेअर्स | | | | | |
| | ड) इतर साहित्य | | | | | |
| ६ | **स्वच्छतागृहे** | | | | | |
| | अ)स्वच्छता गृहांची दुरुस्ती | | | | | |
| | ब) नवीन स्वच्छतागृहे बांधणे | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | **विद्यार्थ्यांसाठीचे बेंचेस/ डेस्क/ टेबल** | | | | | |
| | अ) बेंचेस/डेस्क/टेबल नवीन खरेदी | | | | | |
| | ब) बेंचेस/डेस्क/टेबल दुरुस्ती | | | | | |
| ८ | **शाळा खोल्यांमध्ये /वर्गामध्ये विद्युत पंख्यांची व्यवस्था** | | | | | |
| ९ | **इनव्हर्टरची सुविधा निर्माण करणे (मुंबई शहर व उपनगरे वगळून)** | | | | | |
| १० | **इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य.** | | | | | |
| | **एकूण** | | | | | |

१८) मागणी केलेली एकूण रक्कम रु. ________________

१९) या योजनेंतर्गत पूर्वी अनुदान घेतले आहे काय ? तपशील द्यावा______________________ (जसे लाभ मिळाल्याची रक्कम प्रयोजन)

२०) योजनेंतर्गत लाभ मिळालेल्या प्रयोजनासाठीच निधीचा वापर केलाअसल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणि उपयोगिता प्रमाणपत्र जोडले आहे काय ? होय / नाही

मी/ आम्ही श्री./श्रीमती ..................................व श्री./श्रीमती ...................... असे प्रमाणित करतो की,आमच्या ..................................संस्थेव्दारा संचलित ................................... या शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळांसाठी अनुदान मागणी संदर्भात उपरोक्त दिलेल्या सर्व माहितीची पडताळणी केली असून सर्व माहिती सत्य व बरोबर आहे.

सही -

नांव -

हुद्दा - सचिव अध्यक्ष

शिक्का -

**(अल्पसंख्याक खाजगी शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व अपंग शाळेमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना )**

**प्रतिज्ञापत्राचा नमुना**

**<u>प्रपत्र - १</u>**

मी/ आम्ही श्री./श्रीमती ....................................व श्री./श्रीमती ...................... असे प्रमाणित करतो की, आमच्या ......................................संस्थेव्दारा संचलित .................................... या शाळेसाठी अल्पसंख्याक बहुल खाजगी शाळांना / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळांना पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतच्या महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजनेंतर्गत विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह सादर केला आहे. अनुदान मागणी संदर्भात अर्जामध्ये दिलेल्या सर्व माहितीची मी / आम्ही पडताळणी केली असून सर्व माहिती सत्य व बरोबर आहे. मी / आम्ही प्रपादन करतो की, आमच्या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित शाळेमध्ये / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ७० % / अपंग शाळेमध्ये ५० % पेक्षा जास्त विद्यार्थी अल्पसंख्याक समाजाचे आहेत. अर्जामध्ये अनुदान मागणी केलेल्या पायाभूत सोयी-सुविधा आमच्या शाळेसाठी / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळेसाठी आवश्यक असून या योजनेंतर्गत निधी उपलब्ध झाल्यास सदर निधी अर्जामध्ये प्रस्तावित केलेल्या पायाभूत सोयी-सुविधांसाठी योग्यरित्या वापरला जाईल. मी / आम्ही असेही प्रपादन करतो की, या निधीचा गैरवापर झाल्यास अथवा अर्जामधील माहिती असत्य आढळून आल्यास आमच्या विरुध्द / संस्थेविरुध्द कायदेशीर / दंडात्मक कार्यवाही केली जाऊ शकते तसेच संस्थेचा अर्ज रद्दबातल ठरु शकतो आणि मंजूर अनुदान शासनास परत केले जाईल याची आम्हांस जाणीव आहे.

मी / आम्ही याव्दारे हमी देतो की आमच्या संस्थेस मंजूर झालेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र **(प्रपत्र -५ नुसार)** खरेदीच्या पावत्यांच्या सत्यप्रतीसह संस्था अनुदान मंजूरीच्या तारखेपासून **९० दिवसांच्या आंत** शासनास सादर करेन.

सही -

नांव -

हुद्दा - सचिव अध्यक्ष

शिक्का -

**(अल्पसंख्याक खाजगी शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना)**

**<u>प्रपत्र - २</u>**

**संस्थेच्या सदस्यांची यादी**

| अ.क्र. | सदस्याचे पूर्ण नाव (आडनांव प्रथम) | पूर्ण पत्ता दूरध्वनी क्रमांक | हुद्दा |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

सही -

नांव -

हुद्दा - सचिव अध्यक्ष

शिक्का -

## इयत्ता निहाय विद्यार्थी संख्या

प्रमाणित करण्यात येते की, ............................................................................ या संस्थेव्दारा संचलित............................................................... या शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळांस वर्ष .................. साठी खालील तक्त्यात नमूद केलेली विद्यार्थ्यांची पटसंख्या मंजूर करण्यात आली आहे. असे ही प्रमाणित करण्यात येते की, संस्थेने अर्जामध्ये केलेली मागणी वाजवी असून संस्थेस आर्थिक मदत मंजूर करण्यास शिफारस आहे.

| अ.क्र. | इयत्ता | विद्यार्थी संख्या | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | अल्पसंख्याक | | | | | | सर्व - साधारण | एकूण |
| | | | | मुस्लिम | बौध्द | ख्रिश्चन | जैन | शीख | पारसी | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची संख्या :-
सर्वसाधारण प्रवर्गातील विद्यार्थ्यांची संख्या :-
एकूण विद्यार्थी संख्या :-

सही -
नांव -
हुद्दा - गट शिक्षणअधिकारी/ शिक्षण निरिक्षक/ उप शिक्षणाधिकारी

शिक्का - ................
जिल्हा - ...............

**प्रपत्र - ४**

**(आगाऊ पावती)**

अल्पसंख्याक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळेंमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेतंर्गत, सन...............या वर्षी आमच्या ............................................ संस्थेच्या .....................................................शाळा /कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळेस महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभागाकडून मंजूर करण्यात आलेले अनुदान रुपये ................/- (अक्षरी रुपये ...............................................) चा धनादेश क्रमांक .................. दिनांक ......................... जिल्हाधिकारी,______________ यांच्याकडून प्राप्त झाला.

सही -

नांव -

हुद्दा - सचिव अध्यक्ष

शिक्का -

## प्रपत्र -५
## उपयोगिता प्रमाणपत्र

मी/आम्ही श्री ..................................................................................................
आणि श्री................................................................................ असे प्रमाणित करतो की, महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई मार्फत अल्पसंख्याक खाजगी शाळा / कनिष्ठ महाविद्यालय / अपंग शाळेमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेंतर्गत आमच्या...........................................................................................या संस्थेच्या ................................................................ या शाळेस /कनिष्ठ महाविद्यालयास / अपंग शाळेस वर्ष २० -२० मध्ये मंजूर झालेल्या रु.......................... (अक्षरी रुपये....................................................) एवढया अनुदानाचा उपयोग आम्ही खालील प्रयोजनांसाठी केला आहे आणि सदर अनुदान ज्या बाबींसाठी मंजूर करण्यात आले होते त्याच प्रयोजनांसाठी खर्च करण्यात आले आहे.

| अनु.क्र. | तपशील | खर्च (रु.) |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| | एकूण रु. | |

आम्ही असेही प्रमाणित करतो की, सदर खर्च विहित पध्दतीचा अवलंब करुनच करण्यात आला आहे.

सही -
नांव -
हुद्दा - सचिव अध्यक्ष

शिक्का -

प्रतिस्वाक्षरी
सही -
नांव -
हुद्दा - गट शिक्षणाधिकारी//शिक्षण निरिक्षक/
उप शिक्षणाधिकारी,
शिक्का -

## शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अविवि-२०१२/प्र.क्र.३६/१२/का-६, दि. , २०११ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट - ब

अनुक्रमांक :

संस्थेचे नाव व संपूर्ण पत्ता (दूरध्वनी / भ्रमणध्वनीसह) : ----------------------------------------------
----------------------------------------------

शाळेचे नाव व संपूर्ण पत्ता (दूरध्वनी / भ्रमणध्वनीसह) : ----------------------------------------------
----------------------------------------------

| अ.क्र. | तपशील | आहे / नाही किंवा तपशील |
|---|---|---|
| १. | प्रपत्र - १.प्रतिज्ञापत्र (स्वंयसाक्षांकित) | |
| २. | प्रपत्र - २ सदस्यांची यादी | |
| ३. | प्रपत्र - ३ पटसंख्येचा दाखला (७०% अल्पसंख्याक विद्यार्थी असल्याबाबत) | |
| ४. | प्रपत्र- ४ आगाऊ पावती | |
| ५. | ट्रस्ट डीडची सत्यप्रत<br>१)धर्मादाय आयुक्तांकडून प्राप्त अनुसूची - १. | |
| | २)फेरफार अहवालाची प्रत (अनुसूची- (३) ) | |
| ६. | नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत | |
| ७. | शाळेला शासनाने प्रदान केलेल्या मान्यतेची प्रत | |
| ८. | पी.आर. कार्ड/गाव नमुना ७/१२ भाडे पावती | |
| ९. | वार्षिक अहवाल (लगतच्या मागील चार पैकी ३ वर्षाचे) | |
| १०. | दरपत्रकाची प्रत | |
| ११. | अंदाजपत्रक (बांधकामा करिता मागणी केलेली असल्यास) | |
| १२. | इमारतीचे छायाचित्र | |
| १३. | मागणीची एकूण रक्कम व सुविधांचे स्वरुप | |
| १४. | यापूर्वी निधी दिला असल्यास त्याबाबतचा वर्षनिहाय तपशील | |
| १५. | यापूर्वी दिलेला निधी कोणकोणत्या सुविधांसाठी देण्यात आलेला आहे वर्षनिहाय तपशिल | |
| १६. | यापूर्वी निधी दिला असल्यास त्याची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केली आहेत का ? **( वर्षनिहाय )** | |
| १७. | समितीची शिफारस मान्य/ अमान्य | |
| १८. | शासनातर्फे अंतिमतः अनुदानास पात्र/अपात्र | |